# <u>महाराष्ट्र शासन</u>

sopr8.rdd-mh@nic.in
दुरध्वनी क्र. ०२२ २२८४६८९५

क्रमांक :- संकिर्ण २०१६/प्र.क्र.३४२/पं.रा. ८
ग्राम विकास व जलसंधारण विभाग,
सार्वजनिक बांधकाम भवन,२५ मर्झबान पथ,
फोर्ट, मुंबई - ४०० ००१
दिनांक :- १५/०६/२०१६

प्रति,
**अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी,**
जिल्हा परिषद, सर्व.

विषय :- रस्ते व पूल दुरुस्ती (लेखाशिर्ष ३०५४ २४१९) सन २०१६-१७ आर्थिक वर्षाचे सुरुवातीस गट "अ" "ब" "क" व "ड" अंतर्गत दायित्वासाठी आवश्यक निधीबाबत.

संदर्भ :- १) शासन निर्णय क्र. जिपर २०१२/प्र.क्र.११८/पं.रा.८, दि.१०/०९/२०१२

महोदय / महोदया,

**रस्ते व पूल दुरुस्ती आणि परिरक्षणाची कामे** उपलब्ध निधी अपूरा असल्यामुळे **योग्य रितीने होत नसल्याचे** विधीमंडळाच्या कामकाजाच्या दरम्यान व शासनस्तरावर प्राप्त होणाऱ्या **लोकप्रतिनिधी व जनतेच्या** निवेदनांवरुन शासनाचे निदर्शनास आले आहे. **सदर बाब गंभीर असून नवीन दुरुस्तीची कामे जलद गतीने हाती** घेता येत नाहीत. त्यामुळे गट "अ" "ब" "क" व "ड" चालू आर्थिक वर्षातील **दायित्वाची निश्चित माहिती उपलब्ध झाल्यास** वित्त विभागाकडे यासाठी प्रस्ताव पाठविणे शक्य होईल व दायित्वाचे निराकरण करता येऊ शकेल.

सदर वस्तुस्थिती **शासनाच्या निदर्शनास आणण्यासाठी गट "अ" "ब" "क" व "ड"** अंतर्गत रस्ते आणि पूल दुरुस्तीसाठी मागील वित्तीय वर्षअखेर म्हणजेच **दि.१ एप्रिल, २०१६ रोजी** शिल्लक दायित्व किती आहे याबाबतची **अद्यावत माहिती** सोबत जोडलेल्या विवरण प्रपत्रात भरुन या विभागाचे **उपरोक्त मेल ॲड्रेसवर दि.३०/०६/२०१६** पर्यंत **pdf file** मध्ये माहिती सादर करावी.

आपली,

**(रेखा काळसेकर)**
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन.

सोबत :- विहित नमुना प्रपत्र

**प्रत** :- निवड नस्ती (पं.रा.८)

रस्ते व पूल दुरुस्ती / परिरक्षण कार्यक्रम (लेखाशिर्ष ३०५४ २४१९) सन २०१६-१७ साठी गट अ ब क व ड अंतर्गत दायित्वाची माहिती सादर करणेबाबत.

| दायित्व निर्माण होण्याचे स्वरुप | गट अ | | गट ब | | गट क | | गट ड | | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | कामांची संख्या | दायित्वाची रक्कम | कामांची संख्या | दायित्वाची रक्कम | कामांची संख्या | दायित्वाची रक्कम | कामांची संख्या | दायित्वाची रक्कम | |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | |
| काम पूर्ण | | | | | | | | | |
| काम प्रगतीत | | | | | | | | | |
| काम सुरु न झाल्यामुळे | | | | | | | | | |
| कामास जॉब क्रमांक प्राप्त परंतु कार्यारंभ आदेश बाकी | | | | | | | | | |
| **एकूण** | | | | | | | | | |

**सूचना** :- दि.१५/०६/२०१६ रोजी असलेल्या सद्यस्थितीनुसार माहिती सादर करावी.